जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 AUG 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ आणि रोटरी करवीरच्या वतीने आज रंकाळा परिसर स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना आणि रोटरी करवीर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने रविवारी (दि.६) राष्ट्रीय स्वच्छता अभियानांतर्गत सकाळी आठ वाजता रंकाळा परिसर स्वच्छता आणि प्लास्टिक कचऱ्याविषयी जनजागृतीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी असणार आहेत. दरम्यान, ९ ऑगस्ट रोजी शहरातील प्राचीन वास्तू, पुतळे, रस्ते आणि परिसर स्वच्छता अभियान राबवले जाणार आहे. हे स्वच्छता अभियान सकाळी ८ ते ११ या वेळेत असणार असल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे प्र. संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. या स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागाप्रमाणे प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व निर्मूलन यांचे अभियान 'पी सायकल' प्रोजेक्टद्वारे राबवण्याचे नियोजन असल्याचे रोटरी करवीर चॅरिटेबल ट्रस्टने कळवले आहे. प्लास्टिक कचऱ्याविषयी जनजागृतीसाठी वीस महाविद्यालयांतील २००० विद्यार्थ्यांचा सहभाग असेल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.